## ऋ ण नि र्दे श

प्रस्तुत शोधप्रबंध सादर करताना अतिशय आनंद वाटत आहे. प्रस्तुत शोधप्रबंधासाठी डॉ. रामचंद्र मालचंद्र देवस्थळी, प्रपाठक, शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी वेळोवेळी यथोचित मार्गदर्शन करून, प्रोत्साहन देऊन सुट्टीच्या दिवशीही व इतर कामाचा व्याप असतानाही वेळात वेळ काढून निरपेक्ष कर्तव्यबुध्दीने मार्गदर्शन केले आहे. त्यामुळेच मी हा शोधप्रबंध पूर्ण करू शकलो. या माझ्या प्रयत्नाला पूर्णपणे मार्गदर्शन, सहकार्य, सदिच्छा देणाऱ्या गुरुवर्य डॉ. देवस्थळीसाो यांचा मी सदैव ऋणी आहे.

प्रस्तुत शोधनिबंधाच्या संदर्भात श्री शाहू छ. शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी मा. नामदेवराव कांबळे व आमचे प्राचार्य डॉ. के.एस. गुरव यानी माझ्यावर अपत्यवत प्रेम केले आहे. शोधनिबंधाच्या परिपूर्तीपाठीमागे त्यांचे आशिर्वाद उभे आहेत. त्यांचाही मी सदैव ऋणी आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणारे अध्यापक व विद्यार्थी यांनी उत्साहाने व कार्यतत्परतेने प्रश्नावली भरून देण्यामध्ये मोलाचे सहकार्य केले. मी त्यांचा ऋणनिर्देश करणे माझे कर्तव्य समजतो.

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या कार्यामध्ये सहकार्य करणारे माझे सहकारी प्रा. मधुकर वेदांते, प्रा. सांगले, प्रा. पायमल, प्रा. नायकवडी, प्रा. पवार, प्रा. सौ. झापे, प्रा. सौ. भोसले व ग्रंथपाल श्री. जाधव यांचाही मी आभारी आहे.

माझे पिताश्री. व मातोश्री यानी दिलेल्या सक्रिय प्रोत्साहनाबद्दल आणि ज्या ज्ञात अज्ञात व्यक्तींचे सहकार्य लाभले त्या सर्वांचा ऋणी आहे.

सुबक टंकलेखन करून देणारे श्री. कवडे यांच्या सहकार्याबद्दल मी आभार मानतो.

प्रस्तुत शोधप्रबंधाचा उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षणाचे व्यावसायीकरण चांगल्याप्रकारे होण्यासाठी निश्चित उपयोग होईल असा विश्वास वाटतो.

(शिवाजी बापू पाटील)

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : २२·११·१९९०